**ठळक बातम्या**

- जोरदार पावसामुळे राज्यात अनेक ठिकाणी जनजीवन विस्कळीत, उपमुख्यमंत्र्यांनी घेतला परिस्थितीचा आढावा, पुरात अडकलेल्या नागरिकांना बाहेर काढण्यासाठी हेलिकॉप्टरची व्यवस्था करण्याचे निर्देश

- वस्तू आणि सेवा कराचे सुधारित दर देशभरात लागू

- मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्या उपस्थितीत मेट्रो ४ च्या पहिल्या टप्प्याची चाचणी /पुढच्या वर्षअखेरपर्यंत या मेट्रोचे सर्व टप्पे प्रवाशांसाठी खुले होतील, अशी मुख्यमंत्र्यांची ग्वाही

- देशभरातल्या आणखी २५ लाख कुटुंबांना पीएम उज्ज्वला गॅस जोडणी द्यायचा सरकारचा निर्णय

**आणि**

- शारदीय नवरात्रोत्सवाला आजपासून राज्यासह देशभरात सुरुवात

**<><><><><>**

राज्यात जोरदार पावसामुळे काही ठिकाणी पूरस्थिती निर्माण झाली असून, अनेक ठिकाणी जनजीवन विस्कळीत झालं आहे.

धाराशिव जिल्ह्यात परंडा आणि भूम तालुक्यात कालपासून मुसळधार पाऊस पडत आहे. परंडा तालुक्यातल्या नद्यांना पूर आला असून सीना कोळेगाव या सर्वात मोठ्या सिंचन प्रकल्पातून ५१ हजार ९६६ क्युसेक विसर्ग सीना नदीपात्रात केला जात आहे. त्यामुळे तालुक्यातल्या अनेक गावांमधे घरात पाणी शिरल आहे. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन, लष्कर आणि एनडीआरएफ च्या पथकानं मदत आणि बचाव कार्य सुरू केलं असून लाखी आणि ढग पिंपरीमधल्या लोकांना सुरक्षितस्थळी हलवलं आहे. देवगावमधल्या २७ जणांना एनडीआरएफच्या

विमानातून सुरक्षित स्थळी हलवलं आहे. भूम तालुक्यात पुराच्या पाण्यात एक महिला वाहून गेल्याचं वृत्त आहे. अतिवृष्टीमुळे परंडा- बार्शी तसंच परंडा कुर्डूवाडी हे मार्ग बंद झाले आहेत.

उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांनी धाराशिवच्या जिल्हाधिकाऱ्यांशी संपर्क साधून परिस्थितीचा आढावा घेतला आणि पुरात अडकलेल्या नागरिकांना बाहेर काढण्यासाठी हेलिकॉप्टरची व्यवस्था करण्याचे निर्देश दिले.

**बीड** जिल्ह्यात माजलगाव धरणाच्या पाणलोट क्षेत्रात जोरदार पाऊस झाला आहे. त्यामुळे माजलगाव धरणाचे अकरा दरवाजे उघडले आहेत.

**अहिल्या नगर** शहरासह जिल्ह्यात काल रात्रभर जोरदार पाऊस झाला. त्यामुळे शेतीचं मोठं नुकसान झालं आहे. २२७ नागरीकांना सुरक्षित स्थळी हलविण्यात आलं असल्याची माहिती जिल्ह्याचे पालक मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली.

**पैठणचं** जायकवाडी धरण जवळपास पूर्ण भरलं आहे. त्यामुळे धरणाचे १८ दरवाजे उघडले आहेत.

**बुलढाणा** जिल्ह्यातल्या पाडळी, मढ परिसरात आज ढगफुटी सारखा पाऊस पडल्यानं शेतातलं पीक पाण्याखाली गेलं आहे. या पावसामुळे पैनगंगा नदी आपलं पात्र सोडून वाहत आहे.

**लातूर** जिल्ह्यात आजही मुसळधार पाऊस पडला. नदी नाले, ओढ्याना पूर आल्यानं अनेक गावांचा संपर्क तुटला आहे. मांजरा, निम्न तेरणा, तावरजा प्रकल्पाचे दरवाजे उघडल्यानं अनेक ठिकाणी पूरस्थिती निर्माण झाली आहे. अनेक ठिकाणी शेतात पावसाचे पाणी साचल्यानं सोयाबीन, कांदा, मुग, उडीद पिकं वाया गेली आहेत.

**<><><><><>**

वस्तू आणि सेवा करांमध्ये केलेल्या सुधारणा आजपासून लागू झाल्या. याअंतर्गत जीएसटीचा १२ आणि २८ टक्क्यांचा टप्पा रद्द झाला असून फक्त ५ आणि १८ टक्के अशा दोन टप्प्यांमध्येच जीएसटी आकारला जात आहे. याबद्दल अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून…

***होल्ड… व्हीसी-***

(जीएसटी दरांतल्या या सुधारणांमुळे देशाच्या अर्थव्यवस्थेला चालना मिळेल आणि मध्यमवर्ग, युवा आणि देशभरातल्या ग्राहकांना मोठा फायदा होईल, असा विश्वास प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी काल व्यक्त केला. जीएसटीचे नवे दर म्हणजे फक्त कर नसून जीएसटी बचत उत्सव आहे, आत्मनिर्भर भारताच्या दिशेनं हे अतिशय महत्त्वाचं पाऊल आहे, असं प्रतिपादन त्यांनी केलं.

***होल्ड… बाईट- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी***

*जीएसटी प्रणालीत झालेल्या सुधारणा म्हणजे गरीब, युवा, शेतकरी आणि महिलांसाठी काम करण्याच्या प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या वचनबद्धतेचं प्रतीक आहे, अशी ग्वाही केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी समाजमाध्यमावरच्या पोस्टद्वारे दिली.*

*करप्रणालीतल्या सुधारणा हे एक क्रांतिकारी पाऊल असल्याचं मत महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी व्यक्त केलं.*

***होल्ड… बाईट- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस***

*या नव्या करप्रणालीत शालेय वस्तूंवरचा जीएसटी पूर्ण रद्द करण्यात आला आहे. याबद्दल ऐकू या एका शिक्षकाची प्रातिनिधिक प्रतिक्रिया.*

***होल्ड… बाईट)***

**<><><><><>**

वस्तू आणि सेवा करांमध्ये केलेल्या सुधारणा आजपासून लागू झाल्या आहेत. यात जीवन विमा आणि आरोग्य विमा पॉलिसींवरील जीएसटी कर

हटवण्याचा निर्णय जाहीर झाला. या निर्णयाचे **धुळे एलआयसी शाखेत** फटाके फोडून आणि पेढे वाटून स्वागत केले. एलआयसी एजंट संघटनेनं केलेला संघर्ष आणि आंदोलनाला यश मिळाल्याची प्रतिक्रिया व्यक्त होत आहे.

**नाशिक** इथल्या आयुर्विमा कार्यालयाच्या आवारातही विमा कर्मचारी संघटनेनं आज विजयी द्वार सभा घेतली. आयुर्विमा आणि वैद्यकीय विम्यावर कर हटवण्याची मागणी २१ वर्षानंतर पूर्ण झाल्याबद्दल संघटनेनं जल्लोष केला.

**<><><><><>**

मेट्रो ४ च्या पहिल्या टप्प्यातली चाचणी आज मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत झाली. ही मेट्रो वडाळा, घाटकोपर, मुलुंड, कासारवडवली, गायमुख या मार्गावरून धावणार आहे. या मार्गाची लांबी ३५ किलोमीटर असून यासाठी १६ हजार कोटी रुपये खर्च येणार आहे, पुढच्या वर्षीच्या अखेरपर्यंत या मेट्रोचे सर्व टप्पे प्रवाशांकरिता खुले होतील, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी दिली.

**मुख्यमंत्री बाईट होल्ड**

पूर्व उपनगरं, पश्चिम उपनगरं, मुंबई शहर आणि ठाणे शहर या सर्व मार्गांना जोडणारा हा मार्ग असेल. पुढे ही मार्गिका वडाळा ते छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसला जोडणाऱ्या मेट्रो ११ ला जोडली जाणार आहे. त्यामुळे ५८ किमी लांबीची ही मार्गिका देशातील सगळ्यात मोठी मेट्रो मार्गिका असेल. या मेट्रोमधून दररोज १३ लाखापेक्षा जास्त प्रवासी प्रवास करतील, अशी अपेक्षा असल्याचं मुख्यमंत्री म्हणाले.

आजचा दिवस ठाणेकरांसाठी अतिशय आनंदाचा आहे, असं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले.

**<><><><><>**

नवरात्रीच्या पहिल्या दिवशी देशभरातल्या आणखी २५ लाख कुटुंबांना पीएम उज्ज्वला गॅस जोडणी द्यायचा निर्णय सरकारनं घेतला आहे. यामुळे घरोघरी आनंदाचं वातावरण तयार होणार असून महिला सक्षमीकरणाच्या संकल्पाला बळकटी मिळणार आहे, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी समाजमाध्यमावरल्या संदेशाद्वारे म्हणाले.

**<><><><><>**

राज्यभरात आज घटस्थापनेने शारदीय नवरात्रौत्सवाला सुरुवात झाली. राज्यातल्या साडे तीन शक्तिपीठांमध्येही विधिवत घटस्थापना करण्यात आली. साडेतीन शक्तिपीठांपैकी पूर्ण पीठ असलेल्या करवीर निवासिनी अंबाबाईच्या मंदिरात अभिषेक, पूजा झाल्यानंतर **शेखर मुनिश्वर** कुटुंबाने यंदाची घटस्थापना केली. घटस्थापनेनंतर तोफेची सलामी देऊन नवरात्रोत्सवास प्रारंभ झाला. अंबाबाईचं मंदिर फुलांच्या माळा आणि विद्युत रोषणाईने सजवण्यात आलं आहे. तुळजापूर इथल्या श्री तुळजा भवानी मातेची पूजा धाराशिवचे जिल्हाधिकारी किरण पुजार यांच्या हस्ते करण्यात आली. तुळजापूरचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या उपस्थितीत विधिवत घटस्थापना केली. नाशिकच्या श्री सप्तश्रृंगी देवी मंदिरामध्येही आज पहाटे विधिवत घटस्थापना झाली. या सर्व देवस्थानांमध्ये देवीच्या दर्शनासाठी भाविकांनी गर्दी केली आहे. सोलापूर जिल्ह्यात श्री क्षेत्र मार्डी यमाई देवी मंदिरात शारदीय नवरात्र उत्सवाला मंदिरातील घटस्थापनेने प्रारंभ झाला. धुळे जिल्ह्यात एकविरा देवीच्या मंदिरात घटस्थापना, अभिषेक आणि पूजा करण्यात आली.

**<><><><><>**

नागपूर जिल्ह्यात कोराडी इथे महालक्ष्मी देवी संस्थानच्या परिसरात घटस्थापनेचं औचित्य साधून आदिशक्ती ते नारीशक्ती हे अभियान सुरू करण्यात आलं. राज्याचे महसूल मंत्री आणि जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या

हस्ते आज या अभियानाला प्रारंभ झाला. या केंद्रातून सुमारे १ हजार महिलांना दरवर्षी प्रशिक्षण आणि स्वयंरोजगाराच्या मिळणार आहे. ज्या महिलांना त्यांच्या कौशल्याच्या बळावर येथे संधी मिळेल त्या महिलांना योग्य मोबदला देण्याचे निर्देशही बावनकुळे यांनी दिले. यावेळी सुती कपड्यावर कलमकारी, ब्लॉक प्रिंटींग आणि शिलाई प्रशिक्षणाचा प्रारंभही त्यांनी केला.

स्वस्थ नारी सशक्त परिवार या अभियानाचा प्रारंभही आज झाला. त्या अंतर्गत चंद्रपूर जिल्ह्यातल्या राजूरा उपजिल्हा रुग्णालयात आरोग्य शिबीराचं आयोजन करण्यात आलं.

<><><><><>

सेवा पर्व या विशेष मालिकेत आज जाणून घेऊ या स्मार्ट सिटी योजनेद्वारे शहरी भागांसाठी सरकार करत असलेल्या कामाबद्दल…

***होल्ड… व्हीसी-***

स्मार्ट सिटी या योजनेअंतर्गत देशातल्या शहरांचा चेहरामोहरा बदलत आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी जून २०१५ मध्ये सुरू केलेल्या या योजनेतून नागरिकांच्या आकांक्षांचं रूपांतर सत्यात होत आहे. स्मार्ट आणि शाश्वत मार्गाने देशाच्या शहरांमध्ये राहणाऱ्यांचं जीवनमान उंचावणं हा या योजनेचा उद्देश आहे. ही संपूर्ण योजना म्हणजे एक जनचळवळ असल्याचं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी पुण्यात स्मार्ट सिटी प्रकल्पांचं उद्घाटन करताना केलं होतं…

***होल्ड… बाईट- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी***

गेल्या एका दशकात या योजनेची चांगली प्रगती झाली असून ८ हजारापेक्षा जास्त प्रकल्पांपैकी जवळपास ९४ टक्के प्रकल्प पूर्ण झाले आहेत. शिवाय, १३ हजार कोटी रुपयांचे प्रकल्प पूर्ण होण्याच्या मार्गावर आहेत. या योजनेअंतर्गत आत्तापर्यंत १ लाख ६४ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक झाली आहे.

स्मार्ट सिटी प्रकल्प दहा वर्षं पूर्ण करत असताना या योजनेचा सकारात्मक परिणाम दिसून येत आहे.

<><><><>

राज्यात फेब्रुवारी-मार्च २०२६ मध्ये होणाऱ्या इयत्ता दहावी आणि बारावी परीक्षेसाठी खाजगी विद्यार्थी नाव नोंदणी अर्ज दाखल करण्यास येत्या ३० तारखेपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत ही माहिती देण्यात आली.

<><><><>

माहिती तंत्रज्ञान विभाग हा महत्त्वाचा विभाग असून याचं सक्षमीकरण करण्यात येणार असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी सांगितलं. ते आज माहिती तंत्रज्ञान विभागाच्या बैठकीत बोलत होते. शासनाच्या सर्व सेवांना डिजिटल स्वरूपात उपलब्ध करून देणं, कृत्रिम बुद्धिमत्ता, बिग डेटा आणि सायबर सुरक्षा यांसारख्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढवणं याला शासनाचं प्राधान्य असल्याचं मुख्यमंत्री म्हणाले.

<><><><>

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षाचा मुख्य कार्यक्रम नागपूर इथं २ ऑक्टोबरला विजयादशमीच्या दिवशी सकाळी होणार आहे. माजी राष्ट्रपती डॉक्टर रामनाथ कोविंद  या कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत. या विशेष कार्यक्रमासाठी देशभरातून नेहमीपेक्षा तीन पट अधिक  स्वयंसेवक उपस्थित राहतील, असा अंदाज असल्याचं संघाच्या प्रचारप्रमुखांनी दिली.

<><><><>

नागपूरमधल्या क्षेत्रीय आयुर्वेद अनुसंधान संस्थेत १०व्या आयुर्वेद दिवसानिमित्त  १० ते २३ सप्टेंबर दरम्यान विविध उपक्रम राबवण्यात आले. यंदाच्या आयुर्वेद दिवसाची मुख्य संकल्पना “जनसामान्यासाठी आणि पृथ्वीच्या

कल्याणासाठी आयुर्वेद” अशी आहे. आयुर्वेद दिनाच्या निमित्ताने लठ्ठपणा नियंत्रणासाठी आयुर्वेदीय आहार, आयुर्वेदाचे डिजिटल रूपांतर, कर्करोग प्रतिबंधात आयुर्वेदाची भूमिका अश्या अनेक विषयांवर चर्चा करण्यात आली.

<><><><><>

पालघरचं सोनोपंत दांडेकर महाविद्यालय आणि सर्वद फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमानं २७ सप्टेंबरला राज्यस्तरीय साहित्य संमेलन होत आहे. दांडेकर महाविद्यालयात होणाऱ्या साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी शिक्षणतज्ज्ञ महादेव रानडे आहेत. ग्रंथदिंडीनं संमेलनाला सुरूवात होईल. कवीसंमेलन, विविध सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहेत.

<><><><><>

मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समधे आज ४६६अंकांची घसरण झाली आणि तो ८२ हजार १६० अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही १२५ अंकांची घसरण नोंदवत २५ हजार २०२ अंकांवर बंद झाला.

<><><><><>

तिसाव्या बुसान आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचं आयोजन दक्षिण कोरियात बुसान इथे आयोजित केला जात आहे. भारतीय चित्रपट विकास महामंडळाने आपल्या समाज माध्यमावरच्या संदेशात ही माहिती दिली आहे. आशियाई चित्रपट बाजारापेठेतल्या वेव्ह्ज बाजार भारत पॅव्हेलियन हा सहकार्याचा नवा पर्याय म्हणून उदयाला आला आहे. नवीन कथा सादर करण्यापासून ते सहनिर्मिती आणि वितरणासाठी भागीदारी शोधण्यापर्यंत भारतातल्या आशय निर्मात्यांना आंतरराष्ट्रीय चित्रपट समुदायाशी जोडणारा पूल म्हणून काम करत आहे. माहिती आणि प्रसारण राज्यमंत्री डॉ. एल. मुरुगन या महोत्सवात सहभागी होण्यासाठी बुसान इथे पोहोचले आहेत.

<><><><><>

येत्या दोन दिवसात कोकण आणि मराठवाड्यात अनेक ठिकाणी, तर मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात काही ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे. या काळात मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी जोरदार पाऊस पडण्याची शक्यता आहे.

//<><><><><>//